# परिसर अभ्यास

## (भाग १)

### इयत्ता चौथी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक :
प्राशिसं/२०१३-१४/६९००/मंजुरी/ड-५०५ दिनांक ०२.०५.२०१४

# परिसर अभ्यास
## (भाग १)

इयत्ता चौथी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे

4XLEH2

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०१४**

**सातवे पुनर्मुद्रण : २०२१**

**© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४.**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**शास्त्र विषय समिती :**

- **डॉ. रंजन केळकर, अध्यक्ष**
- डॉ. विद्याधर बोरकर, सदस्य
- श्रीमती मृणालिनी देसाई, सदस्य
- डॉ. दिलीप रा. पाटील, सदस्य
- श्री. अतुल देऊळगावकर, सदस्य
- डॉ. बाळ फोंडके, सदस्य
- श्रीमती विनिता तामणे, सदस्य-सचिव

**भूगोल विषय समिती :**

- **डॉ. एन. जे. पवार, अध्यक्ष**
- डॉ. मेधा खोले, सदस्य
- डॉ. इनामदार इरफान अजिज, सदस्य
- श्री. अभिजित घोरपडे, सदस्य
- श्री. सुशिलकुमार तिर्थकर, सदस्य
- श्रीमती कल्पना माने, सदस्य
- श्री. रविकिरण जाधव, सदस्य-सचिव

**नागरिकशास्त्र विषय समिती :**

- **डॉ. यशवंत सुमंत, अध्यक्ष**
- डॉ. मोहन काशीकर, सदस्य
- डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सदस्य
- डॉ. उत्तरा सहस्रबुद्धे, सदस्य
- श्री. अरुण ठाकूर, सदस्य
- श्री. वैजनाथ काळे, सदस्य
- श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**नकाशाकार : श्री. रविकिरण जाधव**

**मुखपृष्ठ : श्री. निलेश जाधव**

**चित्रे व सजावट : श्री. निलेश जाधव, श्री. दीपक संकपाळ, श्री. मुकीम तांबोळी, श्री. संजय शितोळे, श्री. विवेकानंद पाटील, रुपेश घरत.**

**अक्षरजुळणी : मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.**

**कागद :** ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश :** एन्/पिबी/२०२१-२२/(३०,००० प्रती)

**मुद्रक :** मे. श्री ऑफसेट प्रिंटींग,कोल्हापूर

**संयोजक**

**श्रीमती विनिता तामणे,**
विशेषाधिकारी शास्त्र

**श्री. मोगल जाधव,**
विशेषाधिकारी इतिहास व नागरिकशास्त्र

**श्री. रविकिरण जाधव,**
विशेषाधिकारी भूगोल

**निर्मिती**

**श्री.सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. विनोद गावडे,**
निर्मिती अधिकारी

**सौ. मिताली शितप,**
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**श्री. विवेक उत्तम गोसावी,**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा

व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी **बंधुता**

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्‌ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्‌धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९', 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२००५' आणि महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१०, नुसार राज्याचा 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम- २०१२' तयार करण्यात आला. या शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तकांची नवीन माला २०१३-२०१४ या शालेय वर्षापासून टप्प्याटप्प्याने पाठ्यपुस्तक मंडळ प्रकाशित करत आहे. या मालेतील परिसर अभ्यास भाग-१ इयत्ता चौथीचे हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद वाटतो आहे.

सर्व अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, कृतिप्रधानता व ज्ञानरचनावादावर भर दिला जावा, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्याने किमान क्षमता आणि जीवनकौशल्ये प्राप्त करावीत आणि शिक्षणाची प्रक्रिया रंजक आणि आनंददायी व्हावी, हा दृष्टिकोन समोर ठेवून या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे. तसेच अभ्यासक्रमात निर्देशित केलेल्या दहा गाभा घटकांना अनुसरून सदर पुस्तकाचे लेखन केले आहे.

या पाठ्यपुस्तकात आशयाला अनुरूप अनेक रंगीत चित्रे आहेत. चित्रभाषेच्या माध्यमातून आशयाचे आकलन आणि ज्ञानाची निर्मिती परिणामकारक करण्याचा हा प्रयत्न आहे. या पाठ्यपुस्तकात 'सांगा पाहू', 'करून पहा', 'जरा डोके चालवा', अशा शीर्षकांखाली कृतीही दिल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना पाठ्यांशातील संबोध व संकल्पनांचे आकलन व त्यांचे दृढीकरण होण्यास मदत होईल. तसेच हे पाठ्यपुस्तक त्यांच्या परिसराचे निरीक्षण करण्यास उद्युक्त करायला लावणारे आहे. कालानुरूप आणि आशयसुसंगत अशी जीवनमूल्येही विद्यार्थ्यांवर सहजपणे बिंबवण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला आहे.

पाठ्यांशातील संबोधांची उजळणी व्हावी, त्यांचे स्थिरीकरण व्हावे, स्वयंअध्ययनाला प्रेरणा मिळावी म्हणून स्वाध्यायांतही विविधता आणली आहे. स्वाध्यायांचे स्वरूप रंजकतापूर्ण आहे. शिक्षकांनाही विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करता येईल अशा प्रकारे पुस्तकाच्या मांडणीत विचार केला आहे.

या पाठ्यपुस्तकातून विद्यार्थ्यांना त्यांच्या नैसर्गिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिसराची ओळख होणार आहे. त्यांचा परिसराकडे बघण्याचा दृष्टिकोन निरामय व्हावा, त्यांच्यात समस्यांचे निराकरण करण्याची आणि उपयोजनात्मक कौशल्ये विकसित व्हावीत असा प्रयत्न आहे.

या पाठ्यपुस्तकाची भाषा वयोगटाला सुगम अशीच आहे. विज्ञान, भूगोल व नागरिकशास्त्र असे विषयांचे कप्पे न पाडता सर्व विषयांची मांडणी आंतरविद्याशाखीय दृष्टीने करण्यात आली आहे. त्यामुळे एखाद्या प्रश्नाचे व विषयाचे अनेक आयाम एकाच वेळी शिकण्याची दृष्टी विकसित होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व स्मरणात ठेवून परिसर अभ्यास भाग-१ हे पाठ्यपुस्तक तयार करण्याचा प्रयत्न पाठ्यपुस्तक मंडळाने केला आहे.

हे पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ व अभ्यासक्रम समिती सदस्य यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले आहे. आलेल्या सर्व सूचना व अभिप्राय यांचा विषय समित्यांनी योग्य तो विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

मंडळाच्या शास्त्र, भूगोल व नागरिकशास्त्र या समित्यांतील सदस्य, कार्यगट सदस्य, गुणवत्ता परीक्षक व चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पाठ्यपुस्तक तयार झाले आहे. मंडळ या सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

**(चं.रा.बोरकर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे :
दिनांक : २ मे २०१४-अक्षय्य तृतीया

**शास्त्र विषय कार्यगट सदस्य :** • श्रीमती सुचेता फडके • श्री. वि. ज्ञा. लाळे • श्रीमती संध्या लहरे • श्री. शैलेश गंधे • श्री. अभय यावलकर • डॉ. राजाभाऊ ढेपे • डॉ. शमीन पडळकर • श्री. विनोद टेंबे • डॉ. जयसिंगराव देशमुख • डॉ. ललित क्षीरसागर • डॉ. जयश्री रामदास • डॉ. मानसी राजाध्यक्ष • श्री. सदाशिव शिंदे • श्री. बाबा सुतार • श्री. अरविंद गुप्ता.

**भूगोल विषय कार्यगट सदस्य :** • श्री. भाईदास सोमवंशी • श्री. विकास झाडे • श्री. टिकाराम संग्रामे • श्री. गजानन सूर्यवंशी • श्री. पद्‍माकर प्रल्हादराव कुलकर्णी • श्री. समनसिंग भिल • श्री. विशाल आंधळकर • श्रीमती रफत सैय्यद • श्री. गजानन मानकर • श्री. विलास जामधडे • श्री. गौरीशंकर खोबरे • श्री. पुंडलिक नलावडे • श्री. प्रकाश शिंदे • श्री. सुनील मोरे • श्रीमती अपर्णा फडके • डॉ. श्रीकृष्ण गायकवाड • श्री. अभिजित दोड • डॉ. विजय भगत • श्रीमती रंजना शिंदे • डॉ. स्मिता गांधी

**नागरिकशास्त्र विषय कार्यगट सदस्य :** • डॉ. चैत्रा रेडकर • प्रा. साधना कुलकर्णी • डॉ. श्रीकांत परांजपे • डॉ. बाळ कांबळे • प्रा. फकरूद्‍दीन बेन्नूर • प्रा. नागेश कदम • श्री. मधुकर नरडे • श्री. विजयचंद्र थत्ते

## इयत्ता चौथी : परिसर अभ्यास भाग–१

| अध्ययनात सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **अध्ययनार्थ्यांस जोडीने/ गटामध्ये/ वैयक्तिकरित्या अध्ययनाच्या संधी देणे व त्यास पुढील गोष्टींसाठी प्रवृत्त करणे.**<br>• लगतच्या परिसरातील बाबींचे निरीक्षण करणे व शोधणे. जसे की – घर, शाळा, शेजार,विविध सर्वसाधारण निरीक्षणक्षम वस्तू/ फुले / वनस्पती /प्राणी/पक्षी यांची बाह्य वैशिष्ट्ये. विविधता दृश्य स्वरूप, हालचाली राहण्याचे ठिकाण, अन्न, गरजा, घरटे बांधण्याची सहज प्रवृत्ती, समूहातील वर्तन इत्यादी.<br>• कुटुंबातील ज्येष्ठांशी / सदस्यांशी चर्चा करणे व प्रश्न विचारणे जसे की कुटुंबातील काही लोक एकत्र राहतात. चर्चा करतात व काही दूर राहतात, हे समजून घेणे. दूर राहणारे नातेवाईक, स्नेही यांच्याशी संवाद साधून त्यांची घरे, दळणवळणाची साधने व त्यांच्या ठिकाणचे लोकजीवन याविषयी जाणून घेणे.<br>• विविध स्थळांना भेटी देणे, जसे की पाकगृह, घरातील स्वयंपाकगृह, मंडई, वस्तुसंग्रहालय, वन्यजीव अभयारण्य, शेते, पाण्याचे नैसर्गिक स्रोत, पूल, बांधकामांची ठिकाणे, स्थानिक उद्‍योग, दूरचे नातेवाईक, मित्र, चित्रे, गालीचे, हस्तकला इत्यादी बनवण्यासाठीची प्रसिद्‍ध स्थळे.<br>• भाजीपाला विक्रेते, फूल विक्रेते, मधुमक्षिका पालन करणारे, बागकाम करणारे, शेतकरी, वाहन चालक, आरोग्य अधिकारी आणि संरक्षण अधिकारी इत्यादी लोकांशी आदान–प्रदान करून त्यांचे काम, त्यांची कौशल्ये, त्यांनी उपयोगात आणलेली साधने जाणून घेणे.<br>• काळानुरूप कुटुंबातील काळात झालेले बदल, कुटुंबातील विविध सदस्यांच्या भूमिका, साचेबद्‍धपणा / भेदभाव घरात / शाळेत शेजारी लोकांना प्राण्यांना, पक्ष्यांना, झाडांना मिळणारी अन्याय्य वागणूक यांविषयी ज्येष्ठांचे अनुभव व दृष्टिकोन जाणून घेणे.<br>• भीती न बाळगता किंवा न संकोचता अनुभवावर प्रश्न तयार करणे व मनन करणे.<br>• चित्र / खुणा/ रेखाटन, हावभाव, बोलण्यातून आणि साध्या भाषेतून वाक्ये व परिच्छेद लिहून स्वतःचे अनुभव निरीक्षणे सामयिक करणे.<br>• निरीक्षणक्षम वैशिष्ट्यांमधील साम्य व भेदाच्या आधारे गोष्टींची/ वस्तूंची तुलना करणे आणि त्यांचे वर्गीकरण करणे. | **अध्ययनार्थी –**<br>04.95A.01 लगतच्या परिसरातील फुले, मुळे, फळे यांचे (आकार, रंग आणि गंध तसेच कोठे वाढतात व तत्सम) सामान्य वैशिष्ट्ये ओळखतात. पक्षी आणि प्राण्यांची विविध वैशिष्ट्ये ओळखतात, जसे की, चोच/दात, पंजे, कान, केस, घरटे/ निवारा इत्यादी.<br>04.95A.02 विस्तारित कुटुंबातील सदस्यांचे एकमेकांशी असलेले नातेसंबंध ओळखतात.<br>04.95A.03 प्राण्यांचे समूह व समूहांतर्गत वर्तन (उदा. मुंग्या, मधमाशी, हत्ती, पक्ष्यांचे वर्तन) विशद करतात. कुटुंबातील बदल (उदा. जन्म, लग्न, बदली इत्यादींमुळे होणारे बदल) स्पष्ट करतात.<br>04.95A.04 दैनंदिन जीवनातील कौशल्याधारित कामे (शेती, बांधकाम, कला, हस्तकला) त्यांचा वडीलधाऱ्यांकडून मिळणारा वारसा व प्रशिक्षण संस्थांची भूमिका यांचे वर्णन करतात.<br>04.95A.05 स्रोतापासून ते घरापर्यंत जीवनाश्यक वस्तूंच्या निर्मिती आणि प्राप्तीची प्रक्रिया विशद करतात. (उदा. अन्न, पाणी, वस्त्र)<br>04.95A.06 भूतकाळातील आणि सध्याच्या वस्तू आणि कृती यांमधील फरक सांगतात. (उदा. परिवहन, चलन, घरे, साहित्य, साधने, कौशल्ये इत्यादी)<br>04.95A.07 प्राणी, पक्षी, वनस्पती, वस्तू, टाकाऊ पदार्थ, सामग्री यांचे गट तयार करतात. (उदा. दृश्य स्वरूप, गुणविशेष, वापर इत्यादी)<br>04.95A.08 प्रमाणित व स्थानिक एककांमध्ये (किलो, गज, पाव) गुणधर्म, इत्यादींचा अंदाज बांधतात, अवकाशीय राशींचा (लांबी, वजन, वेळ, कालावधी इत्यादी) अंदाज घेतात तसेच सामान्य साधने वापरून सत्यता पडताळतात.<br>04.95A.09 निरीक्षणे /अनुभव/ माहितीची विभिन्न प्रकारांनी नोंद ठेवतात आणि परिसरातील विविध घटनांच्या आकृतिबंधाचे अंदाज देण्यासाठी कारण व परिणाम यांच्यातील संबंध प्रस्थापित करतात. (उदा. बाष्पीभवन, संघनन, शोषण, विरघळणे) |

- आईवडील / पालक / आजी-आजोबा, शेजारील वडीलधारे यांच्याशी चर्चा करणे आणि त्यांच्या आयुष्यातील, भूतकाळातील व सध्याच्या दैनंदिन वापराच्या वस्तू उदा. कपडे, भांडी, कामाचे स्वरूप, खेळ यांची तुलना करणे,विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे समावेशन.
- आपल्या परिसरातील झाडांची गळलेली फुले, मुळे, मसाले, बिया, कडधान्ये, पिसे, वर्तमानपत्रे, मासिकांतील लेख, जाहिराती, चित्रे, नाणी, टपाल तिकिटे अशा वस्तू व पदार्थ जमवून त्यांची नाविन्यपूर्ण पद्‌धतीने मांडणी करणे.
- आपल्या क्षमतांप्रमाणे वेगवेगळ्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग करून निरीक्षण करणे / वास घेणे / चव घेणे / स्पर्श अनुभवणे / ऐकणे यासाठी साधे व सोपे उपक्रम व प्रयोग करणे जसे की पाण्यामध्ये इतर पदार्थांची विद्राव्यता तपासणे, मीठ आणि साखर पाण्यातून वेगळे करणे, ओले कापड वाळण्यास किती वेळ घेते. (सूर्यप्रकाशात, खोलीत, गुंडाळी करून, पसरवून, पंख्याचा वापर करून / न करता तसेच गरम हवेचा झोत, थंड हवेचा झोत वापरून.)
- दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांचे/प्रसंगांचे, परिस्थितीचे जसे की फुले, मुळे कशी वाढतात, वजन, उचलणे (कप्पी वापरून / कप्पीविना) यांचे निरिक्षण करून अनुभव सामयिक करणे. साध्या प्रयोग व कृतींमधूनही वेगवेगळ्या मार्गांच्या उपयोगाने निरीक्षणे / तपासणी पडताळून पाहणे/ त्यांची चाचणी करणे.
- बसचे/रेल्वेचे/तिकिटे, चलनी नोटा, नकाशावरील ठिकाणे निश्चित करणाऱ्या सूचना तसेच दिशादर्शक फलक यांचे वाचन करणे. विविध पदार्थ वापरून आकृतिबंध, चित्रे, प्रतिकृती, कोलाज, विशिष्ट घाट, कविता, गोष्टी, घोषवाक्ये यांच्या निर्मितीसाठी व ऐनवेळच्या विस्तारासाठी स्थानिक व टाकाऊ पदार्थ.
- पदार्थांचा वापर करणे, उदा. माती वापरून मडकी/भांडी बनवणे, रिकाम्या काडीपेट्या, पुठ्ठे, टाकाऊ पदार्थ वापरून अशा वस्तू बनवणे.
- घरी / शाळेत / समाजात आयोजित केलेल्या विविध सांस्कृतिक / राष्ट्रीय / पर्यावरणाच्या, उत्सव / विविध प्रसंगांमध्ये भाग घेणे. उदा. सकाळच्या किंवा विशेष सभा/ प्रदर्शन/ दिवाळी / ओणम/ वसुंधरा दिन/ ईद इत्यादी तसेच समारंभांमध्ये, नृत्य, नाट्य, अभिनय, सर्जनशील लेखन व कृती करणे. (उदा. पणत्या / रांगोळी / पतंग बनवणे, इमारतींच्या प्रतिकृती, नद्यांवरील पुलांच्या प्रतिकृती बनवणे इत्यादी) कथा, कविता, घोषवाक्ये, घटनांच्या अहवालांचे कथन, सर्जनशील लेखन किंवा एखाद्या सर्जनशील कृतीतून सादर करणे.
- पाठ्यपुस्तकाच्या बरोबर इतर संसाधने वाचणे / शोधणे जसे, वृत्तपत्रांमधील कात्रणे, श्राव्य साधने/ गोष्टी / कविता / चित्रे/ चित्रफिती / स्पर्शाने जाणवणारे उठावदार साहित्य, आंतरजाल / ग्रंथालय तत्सम अन्य कोणतेही संसाधन.
- कचरा कमी करणे व सार्वजनिक मालमत्तेचा सुयोग्य वापर व काळजी तसेच विविध प्राणी, जलप्रदूषण आणि कचरानिर्मिती, आरोग्य स्वच्छता यासंबंधात पालक / शिक्षक / सहाध्यायी आणि घरातील, परिसरातील ज्येष्ठ यांच्याकडून माहिती घेणे, चर्चा करणे, चिकित्सक विचार करणे आणि याविषयी घरी/ शाळेत / शेजारी यांच्याशी मुलांशी निगडित परिस्थितींवर मनन करणे.
- आपल्या देशातील राज्य व राज्यातील अन्नपदार्थांत विविधता असणाऱ्या कारणांचा शोध घेणे.
- पारंपरिक व आधुनिक पोशाखातील फरक समजणे.
- नकाशात विविध चिन्हे, खुणा व सूची यांचा वापर करता येणे.
- राज्यातील भाषा, बोलीभाषा, सण व उत्सव यांची माहिती जमा करणे.

04.95A.10 नकाशाचा वापर करून वस्तू /ठिकाणे यांच्या खुणा / स्थान ओळखतात व जवळच्या खुणेवरून शाळा / शेजार यांच्या दिशांचे मार्गदर्शन करतात.

04.95A.11 दिशादर्शक पाट्या, पोस्टर, चलन, रेल्वे तिकीट, वेळापत्रकावरच्या माहितीचा वापर करतात. चलनी नोटा, शाळा/ शेजार, प्रवाह तक्ते इत्यादींच्या प्रतीकृती, रांगोळी, भित्तिपत्रक, अल्बम, साधे नकाशे, (शाळा परिसर) इत्यादींची निर्मिती करतात. त्यासाठी स्थानिक उपलब्ध/ टाकाऊ वस्तूंचा वापर करतात.

04.95A.12 कुटुंब/ शाळा / शेजार या ठिकाणी निरीक्षण केलेल्या / अनुभवलेल्या समस्यांवर स्वतःचे मत मांडतात, (उदा. साचेबद्‌धपणा/ भेदभाव/ बालहक्क)

04.95A.13 आरोग्य रक्षण, कचरा कमी करणे, त्याचा पुनर्वापर करणे, त्यावर पुन:प्रक्रिया करून उपयोगात आणणे यांसाठी मार्ग सुचवितात आणि विविध सजीव संसाधने (अन्न, पाणी व सार्वजनिक मालमत्ता) यांची काळजी घेतात.

04.95A.14 गटात एकत्र काम करत असताना एकमेकांविषयी आस्था, समानानुभूती व नेतृत्वगुण या बाबींमध्ये पुढाकार घेतात व सक्रिय सहभाग घेतात. उदा. वर्गातील (Indoor)/ वर्गाबाहेरील (Outdoor)/स्थानिक/समकालीन उपक्रम आणि खेळ तसेच वनस्पतींची काळजी घेणे, पशु-पक्ष्यांना खायला देणे, भोवतालच्या वस्तू/वडीलधारे / दिव्यांग यांच्यासाठी प्रकल्प करणे / भूमिका करतात.

04.95A.15 नकाशात जिल्हे व राज्यानुसार प्रमुख खाद्यान्न पिके व प्रसिद्ध खाद्यपदार्थ दाखवतात.

04.95A.16 नकाशातील चिन्हे, खुणा व सूची यांचा वापर करून नकाशाचे वाचन करतात.

04.95A.17 आपला जिल्हा व राज्य यांची प्राकृतिक व मानवनिर्मित घटक या अनुसंधाने तुलना करतात.

04.95A.18 भौगोलिक व सांस्कृतिक कारणामुळे वस्त्रांमधील विविधता सांगतात.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्राण्यांचा जीवनक्रम | १ |
| २. | सजीवांचे परस्परांशी नाते | ७ |
| ३. | साठवण पाण्याची | १६ |
| ४. | पिण्याचे पाणी | २० |
| ५. | घरोघरी पाणी | २८ |
| ६. | अन्नातील विविधता | ३६ |
| ७. | आहाराची पौष्टिकता | ४२ |
| ८. | मोलाचे अन्न | ५० |
| ९. | हवा | ५७ |
| १०. | वस्त्र | ६१ |
| ११. | पाहू तरी शरीराच्या आत | ६७ |
| १२. | छोटे आजार, घरगुती उपचार | ७६ |
| १३. | दिशा व नकाशा | ८१ |
| १४. | नकाशा आणि खुणा | ८६ |
| १५. | माझा जिल्हा माझे राज्य | ९२ |
| १६. | दिवस व रात्र | १०१ |
| १७. | माझी जडणघडण | १०५ |
| १८. | कुटुंब आणि शेजारात होत असलेले बदल | ११० |
| १९. | माझी आनंददायी शाळा | ११५ |
| २०. | माझी जबाबदारी आणि संवेदनशीलता | १२० |
| २१. | समूहजीवनासाठी व्यवस्थापन | १२७ |
| २२. | वाहतूक व संदेशवहन | १३२ |
| २३. | नैसर्गिक आपत्ती | १३९ |
| २४. | आपण परिसर धोक्यात आणत आहोत का ? | १४६ |


**The following foot notes are applicable :-**

1. © Government of India, Copyright 2014.
2. The responsibility for the correctness of internal details rests with the publisher.
3. The territorial waters of India extend into sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.
4. The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh.
5. The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act.1971," but have yet to be verified.
6. The external boundaries and coastlines of India agree wih the Record/Master Copy certified by Survey of India.
7. The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned.
8. The spellings of names in this map, have been taken from various sources.